महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९८ वा | दिनांक : १२/०१/२०२५ | वार : रविवार

## संजय राऊतांनी आधी चर्चा करायला हवी होती : वर्षा गायकवाड



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली. त्यांच्या घोषनेनंतर एकच खळबळ उडाली असून महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या प्रतिक्रियाही समोर येत आहेत. आम्हीही मुंबईपासून ते नागपूरपर्यंत महापालिका निवडणुका कशा लढवायच्या यावर वरिष्ठांशी बोलून ठरवू, असे सूचक वक्तव्य काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊन ठेपल्या आहेत. महायुती या निवडणुकांच्या तयारीला लागली असून, महाविकास आघाडीत बिघाडी होत असल्याचे दिसत आहे. ठाकरे गट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार, अशी घोषणा संजय राऊत यांनी आज केली. महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिल्यानंतर काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी उपरोक्त विधान केले आहे.

महाविकास आघाडी एकत्र राहिली पाहिजे अशीच आमची इच्छा आणि भूमिका असून त्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करत असल्याचे वर्षा गायकवाड म्हणाल्या. ठाकरे गटाच्या महापालिका निवडणुकीच्या भूमिकेसंदर्भात आम्ही वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करणार असून त्यानंतर निर्णय घेऊ, असेही त्या म्हणाल्या. राऊत यांनी अशा गोष्टी थेट माध्यमांमध्ये जाऊन बोलण्यापेक्षा चर्चेच्या माध्यामातून सांगायला पाहिजे होती, अशा शब्दांत वर्षा गायकवाड यांनी संजय राऊत यांच्यावर आगपखाड केली. संजय राऊत त्यांच्या पक्षाचे व्यक्तिगत मत मांडत असतील. पण आमच्या पक्षाची भूमिका लवकरच सांगू, असेही गायकवाड यांनी सांगितले आहे.

आम्हाला निवडणुकीत संधी मिळायला पाहिजे, असे आमच्या कार्यकर्त्यांचेही म्हणणे असल्याचे वर्षा गायकवाड यांनी सांगितले. विधानसभेला मुंबईमध्ये काही ठिकाणी आमच्या जागा निवडून येऊ शकल्या असत्या, असा दावाही त्यांनी केला. महाविकास आघाडीचा लोकसभा एकत्र लढवण्याचा निर्णय झाला, तेव्हा मी लोकसभेचे तिकीट वेगळीकडे मागितले होते. मात्र, मला वेगळ्या ठिकाणी तिकीट देण्यात आले. आम्हाला विधानसभेत म्हणाव्या तशा जागा मिळाल्या नाहीत. तरीही आम्ही आघाडी धर्म प्रामाणिकपणे पाळला. आता महापालिकेच्या निवडणुकीत मुंबईपासून नागपूरपर्यंत काय निर्णय घ्यायचा? ते पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करून आम्ही ठरवू, असे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

## मंत्री शिरसाटांची गुलामी करण्यासाठी महापौराने शिवसेना सोडली : चंद्रकांत खैरे



**छत्रपती संभाजीनगर :** तुटकळ पैशांच्या अमिषापोटी काही पदाधिकाऱ्यांनी आपले इमान गद्दार गटाच्या हाती विकले, अशा शब्दांत शिवसेनेचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी शिंदे गटावर हल्लाबोल केला. यावेळी चंद्रकांत खैरे यांनी नंदकुमार घोडोले यांच्यावरही नाव न घेता टीका केली. मंत्र्याची गुलामी करण्यासाठी महापौराने शिवसेना सोडली, असे ते म्हणाले. तसेच शिवसेनेशी गद्दारी केलेले लोक मुख्यमंत्री झाले. परंतू त्यांना जनमानसात कधीच सन्मान मिळणार नाही, असे विधान अंबादास दानवे यांनी केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा संभाजीनगर जिल्ह्यातील पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांचा शनिवार रोजी मेळावा पार पडला. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे व शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवसेनेचा भगवा ध्वज फडकविण्याचा यावेळी एकमुखाने निर्धार करण्यात आला.

शहरातील संत एकनाथ रंग नाट्यमंदिर येथे संपन्न झालेल्या मेळाव्याची शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस तर शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सुरुवात करण्यात आली. तदनंतर पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते द्वीपप्रज्वलन करण्यात आले. माजी आमदार उदयसिंग राजपूत, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, दिनेश परदेशी, राजू शिंदे, दत्ता गोर्डे, महिला आघाडी जिल्हा संघटिका आशा दातार व युवासेना युवा जिल्हाधिकारी विठ्ठल डमाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तुटकळ पैशांच्या अमिषापोटी काही पदाधिकाऱ्यांनी आपले इमान गद्दार गटाच्या हाती विकले आहे. दोन वेळेस एकाच घरात संभाजीनगरसारख्या महत्त्वपूर्ण महानगरपालिकेचे महापौर पद दिलेल्या माजी महापौराने शिवसेनेशी गद्दारी केली. मंत्री संजय शिरसाट यांची गुलामी करण्यासाठी या महापौराने शिवसेना सोडली असल्याची टीका करत शिवसेना सोडणाऱ्याची परिस्थिती अत्यंत बिकट होत असल्याचे सांगत पक्षांतर करणाऱ्याचा चंद्रकांत खैरे यांनी समाचार घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीत वाटलेला पैसा कुठून आणला? असा प्रश्न देखील खैरे यांनी यावेळी उपस्थित केला.

## सर्व निवडणुका आपल्या सोयीने लढलो तर कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का? सुप्रिया सुळे

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी कायम राहणार का? याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील प्रतिक्रिया देत सूचक विधान केले आहे. सर्व निवडणुका आपल्या सोईने लढलो तर कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का? असे मत सुप्रिया सुळे यांनी मांडले आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले, मात्र, विधानसभा निवडणुकीत दारुण पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील नेते एकमेकांवर आरोप करत टीका करत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका महाविकास आघाडी एकत्र लढणार का? याबाबत अनेक प्रश्न होते. त्यातच आता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली. संजय राऊतांच्या या घोषणेनंतर महाविकास आघाडीतील नेत्यांच्या प्रतिक्रिया येत असून सुप्रिया सुळे यांनीही आपले मत मांडताना उपरोक्त विधान केले.

संजय राऊत यांच्या घोषणेवर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, महानगरपालिकेची निवडणूक आम्ही आधी एकत्र असतानाही वेगवेगळीच लढत होतो. मागची महापालिकेची निवडणूक आम्ही वेगवेगळीच लढलो होतो, त्याच्यामध्ये नवीन काय आहे? त्यामुळे महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत. सगळ्याच निवडणुका सर्वजण आपआपल्या सोईने लढवायला लागले, तर कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का? त्यांना न्याय कधी मिळणार? त्यामुळे महापालिकेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे, त्यांना न्याय मिळालाच पाहिजे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जानेवारी २०२५


## औट्रमघाटात अनेकांना जखमी करणारे माकड अखेर जेरबंद



**कन्नड (अरुण थोरात) :** धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कन्नड घाटात अनेक वाहनचालक, नागरिकांना चावा घेऊन जखमी करणाऱ्या उपद्रवी माकडास जेरबंद करण्यात दि.११ जानेवारी रोजी वनविभागाला यश आले आहे. कन्नड जवळील औट्रमघाटात गेल्या काही महिन्यांपासून एका लाल तोंड्या माकडाने अनेक वाहन चालक, लहान मुले, स्त्रियांना चावा घेऊन जखमी केले होते.

घाटातून प्रवास करणाऱ्या दुचाकी स्वारांवर अचानक हे माकड हल्ला करून त्यांना जखमी करीत त्यामुळे वाहनचालक त्रस्त झाले होते. याबाबत प्रवाशांनी वनविभागाकडे याबाबत तक्रारी केल्या होत्या. मात्र या माकड पकडण्यात यश मिळत नव्हते.

दि.११ जानेवारी रोजी वनविभागाच्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर शितल नगराळे तसेच वन्यजीव विभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्री रहाटवळ यांच्याकडे सह्याद्री प्रतिष्ठानचे केंद्रीय उपाध्यक्ष दिलीप घोरपडे यांनी या माकडाला पकडून इतरत्र हलवण्याची आग्रही मागणी केल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती नगराळे यांनी पाचोरा येथील पशुपक्षी मित्र अतिष चांगरे यांना बोलवून या माकडाचा बंदोबस्त करण्याचे सांगितल्याने अतिष चांगरे व त्यांचे चिरंजीव सुरज चांगरे यांनी सामाजिक वनविभाग व वन्यजीव चाळीसगाव यांच्या मदतीने या माकडास अत्यंत शिताफीने जेरबंद करून रेंज फॉरेस्ट ऑफिसर वन्यजीव विभाग श्री रहाटवळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल श्री जाधव, वनरक्षक विवेक सोनवणे, तसेच वनमजूर लालचंद चव्हाण, बापू आगोणे, पृथ्वीराज चव्हाण, सुभाष कुर्हाडे, भिलू काळे, गणेश राठोड, यांच्या हवाली केल्याने या माकडास पिंजऱ्यात घालून इतरत्र सुरक्षित जंगलात रवाना करण्यासाठी हलविण्यात आले.

सह्याद्री प्रतिष्ठानचे दिलीप घोरपडे यांनी यावेळी या टिम ला स्थानिक तरुण जीवन चव्हाण, मिथुन राठोड, प्रविण सोनवणे, रविंद्र अहिरे, यांनी सहकार्य केले या माकडाला जेरबंद केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. तर प्रवाशांनी वनविभागाचे आभार मानले.

## जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत टापरगाव जि.प.शाळा प्रथम



**कन्नड (अरुण थोरात):** दि. ७ ते १० जानेवारी दरम्यान जिल्हास्तरीय पालक व विद्यार्थी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा परिषदे तर्फे करण्यात आले होते. या अंतर्गत घेण्यात आलेल्या सांस्कृतिक स्पर्धेत कन्नड तालुक्यातील जि. प. प्रा.शा. टापरगाव येथील विद्यार्थ्यांनी प्रथम पारितोषिक पटकावले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील नाट्यगृहात पारपडलेल्या या स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शाळा सहभागी झाल्या होत्या. या सांस्कृतिक स्पर्धेत टापरगाव येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकधारा सादर करून प्रेक्षकांना महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन घडविले.

या कार्यक्रमास शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणानंतर सभागृहातील सर्व प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या व शिट्ट्यांच्या गजरात विद्यार्थ्यांना दाद दिली.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्या हस्ते करण्यात आले. या गीताचे नृत्य दिग्दर्शन शाळेतील सहशिक्षिका वर्षदा आवाळे व छाया माळवाळ यांनी केले. त्यांना सहकार्य शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा पाटील, सहशिक्षिका माधवी गोंडाणे, प्रशिक्षणार्थी स्वप्ना सोनवणे व सहशिक्षिका भावना शिंदे यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेसाठी कन्नड च्या गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ, केंद्रप्रमुख सिताराम आहेर, केंद्रीय मुख्याध्यापक भागवत कल्याणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाने टापरगावच्या विद्यार्थ्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा लावला गेला आहे.

गेल्या महिन्यातच कन्नड येथील बाळासाहेब पवार वाचनालयातर्फे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय समूह नृत्य स्पर्धेत या मुलांना यश मिळाले होते. शाळेची इमारत नसतानाही विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामुळे या शाळेच्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## बौद्ध भिक्खू संघाची भिक्षाटन चारिका सातारा परिसर येथे संपन्न होणार



**छत्रपती संभाजीनगर :** बौद्ध भिक्खू संघाची भिक्षाटन चारिका उद्या रविवारी सकाळी यशोदीप नगर सातारा परिसर येथे संपन्न होणार आहे. त्यात काही श्रद्धावान कुटुंबीय भिक्खू संघास भिक्षान्नदान देणार आहेत. त्या श्रद्धावान कुटुंबीयांची नावे खालील प्रमाणे आहेत १)अलका भारत तीनगोटे २) सुनील किसनराव राऊत ३) विजय संपतराव बनसोडे ४) वर्षा भाग्यदर्शी लोखंडे ५) डॉक्टर प्रदीप लांडगे, ६) आयुष्यमती सोनवणे ताई इत्यादी भिक्खू संघास भिक्षान्नदान, अष्टपरिस्कर दान, आर्थिक दान, फळदान देऊन आपली दान पारमिता पुष्ट करणार आहेत. सर्वजण साधुकारास पात्र आहेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जानेवारी २०२५


## जेईएस महाविद्यालयात भौतिकशास्त्राची आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : शिकणे कधीही थांबवू नका ते चालू ठेवा. विज्ञानात उत्सुकता, नैसर्गिक जगात, शिकण्याची आणि वाचण्याची सवय महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र संशोधन परिषदेच्या समारोप कार्यक्रमात मायको सीड्स कंपनीचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. भरत चार यांनी केले .जेईएस महाविद्यालय जालना येथे भौतिकशास्त्र विषयाच्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन दि.१०व ११ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम बगडिया होते, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मायको सीड्स कंपनीचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. भारत चार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे व्यवस्थापन परिषदचे सदस्य प्राचार्य डॉ. भारत खंदारे होते, व्यासपीठावर डॉ. अरुण पाठक, जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री श्रीनिवास भक्कड प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री, संशोधन परिषदेचे संयोजक प्रा.डॉ. सुशांत देशमुख आदींची उपस्थिती होती.

या संशोधन परिषदे मागची भूमिका व्यक्त करताना प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री म्हणाले की, प्रकृती आणि पुरुष हे दोन महत्वाचे संकल्पना संख्या योग मध्ये सांगितले आहे आजच्या या फिजिकल हार्मोनियम परिषदेमध्ये आपल्याला दोन्ही गोष्टींचा प्रत्यय आला मोक्ष मिळवण्यासाठी या दोन्ही गोष्टी आजच्या परिस्थितीमध्ये महत्त्वाच्या आहेत या परिषदेमुळे आपल्याला अनेक शाखांचे भारतीय शिक्षण परंपरा पेडोगोगेचे यथार्थ दर्शन विद्यार्थ्यांना व शिक्षकांना उपलब्ध असल्याचेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना महिको सीड्स कंपनीचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. भारत चार म्हणाले की शिकणे कधीही थांबू नका ते चालू ठेवा विज्ञानात उत्सुकता नैसर्गिक जगात शिकण्याची आणि वाचण्याची सवय महत्वाची आहे तुमच्या चांगल्या भविष्यासाठी आणि करिअरसाठी ज्ञान गोळा करण्याकरता तरुण मन हे स्पंजासारखी आहे जागतिक युगात बहुतेक प्रमुख कंपन्या डेटा गोळा करणाऱ्या आणि डेटा व्यवस्थापित करणाऱ्या दोन महत्त्वाच्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करतात शेतीमध्ये विविधता सुधारण्यासाठी लागू असलेल्या डी एन एस मोहिमेचा वापर करत आहेत, आता मशीन लर्निंगचा दुहेरी वापर काम करण्यासाठी जास्त शक्ती देतो आणि त्यामुळे रोख प्रतिकार शक्ती उच्च उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या जाती विकसित होत आहेत असेही डॉ. भारत चार यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना श्री पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की, या संशोधन परिषदेमध्ये १५०संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून अशाच प्रकारे अनेक विषयांच्या यापुढे संशोधन परिषद महाविद्यालयामध्ये होतील, त्यामध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, जीएस महाविद्यालयाचे विद्यार्थी देश -विदेशात कार्यरत आहेत त्यांनी आपला नावलौकिक कमावला आहे असेही श्री. बगडिया यांनी सांगितले.यावेळी उत्कृष्ट पेपर प्रेझेंटेशन चा निकाल जाहिर करण्यात आला, असून प्रथम पारितोषिक नामदेव वाघोले यांना तर द्वितीय पारितोषिक शेख खलील यांना मिळाले, ओरल प्रेझेंटेशनचे प्रथम पारितोषिक कु.योगिता वाघमारे यांना प्राप्त झाले.

या संशोधन परिषद संशोधक विद्यार्थी, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच जालना शहरातील उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.करण सातुरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा किशोर तापडिया यांनी मानलेत.

## पुस्तकांशी मैत्री केली तर आयुष्याला नवी दिशा मिळते : डॉ. प्रितम मरळ



**कन्नड (अरुण थोरात):** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाइन व्याख्यानमालेतील २ रे पुष्प मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यंदा तिसऱ्या वर्षात पदार्पण केलेल्या या व्याख्यानमालेचा विषय होता "पुस्तकांच्या सोबतीने करिअरच्या शिखराकडे." या व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. प्रितम विकास मरळ उपस्थित होत्या.

श्रीमती मरळ यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय कशी विकसित करावी, त्याचा अभ्यास व करिअरमध्ये कसा उपयोग होतो, याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, पुस्तकांशी मैत्री केली, तर ती आयुष्याला नवी दिशा मिळते. वाचनातून आत्मविश्वास वाढतो, ज्ञानविश्व विस्तारित होते आणि यशस्वी आयुष्याची वाट मोकळी होते, असे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

ऑनलाइन माध्यमातून आयोजित या व्याख्यानाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या शेवटी वाचनालयाचे ग्रंथपाल नरेश सोनावणे यांनी आभार व्यक्त केले. पदाधिकारी आणि संयोजकांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या, अशा उपक्रमांद्वारे वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प व्यक्त केला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002


## संजय राऊत हे रिकामटेकडे, ते रोजच काहीतरी मत व्यक्त करतात : देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** संजय राऊत हे रिकामटेकडे आहेत. ते रोजच काहीतरी मत व्यक्त करतात. मात्र त्यांच्या मतावर मी व्यक्त व्हायलाच पाहिजे असे नाही. मला कामे असतात. मी रिकामटेकडा नाही. अशा कडक शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या स्वबळाच्या घोषणेवर प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपूर येथे बोलत होते.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वभावावर लढवणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. मुंबईपासून नागपूरपर्यंत सर्वच महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका शब्दात उत्तर दिले आहे. त्यांच्या या घोषणेवर काहीही बोलण्यास मुख्यमंत्र्यांनी नकार दिला आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष यांनी एकत्र निवडणूक लढवली होती. महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढवलेल्या निवडणुकीत लोकसभेत या तीनही पक्षांना चांगले यश मिळाले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. या परभावानंतर महाविकास आघाडी टीकते का? असे प्रश्न उपस्थित केला जात होता. त्यातच आता संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे राऊत यांची ही घोषणा म्हणजे महाविकास आघाडी अस्तित्वात राहणार नसल्याचे संकेत मानले जात आहे.

मुंबई ते नागपूरपर्यंत सर्व महानगर पालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला स्वळावर लढण्याचे सांगितले आहे. या संदर्भात आम्ही पदाधिकाऱ्यांशी तशी चर्चा केली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्हाला देखील पाहायचे आहे की काय होते? असे देखील ते म्हणाले. आघाडीमध्ये लढताना कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही. त्याचा पक्षाच्या वाढीला देखील फटका बसतो. त्यामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषदेमध्ये आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

या संदर्भात काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, इंडिया आघाडी अजूनही मजबूत आहे. दिल्लीमध्ये इंडिया आघाडी एकत्रीत काम करत आहे. महाविकास आघाडी म्हणून आम्ही लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र लढलो होतो. तसेच आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील एकत्रीत लढवण्याचा आमचा प्रयत्न असेल. संजय राऊत हे त्यांच्या पक्षाचे मोठे नेते आहेत. त्यांनी स्वबळावर निवडणुका लढण्याची घोषणा केली असली तरी आम्ही उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांना एकत्र लढवण्याची आम्ही विनंती करणार असल्याची माहिती देखील वडेट्टीवार यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जानेवारी २०२५


## जि.प.प्रशाला चापानेर शाळेत नवोदय सराव परीक्षेचा नवीन उपक्रम संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** जि.प.प्रशाला चापानेर ता. कन्नड शाळेत औराळा विभागा अंतर्गत येणाऱ्या जि.प. व संस्था शाळेतून इयत्ता पाचवी नवोदय परीक्षेत १४१ विद्यार्थी बसले होते. कन्नड तालुक्यातून पहिल्यांदाच अशी परीक्षा घेणारे चापानेर जि. प. प्रशाला ही शाळा पहिली ठरली.

या परीक्षा दि. १० जानेवारी रोजी सकाळी १०:३० ते १२:३९ व ०१:३० ते ०२:३० या वेळेत परिक्षे बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ०२:३० ते ०३:३० या वेळेत बक्षीस वितरण करण्यात आले. या परीक्षेचा सर्व खर्च चापानेर येथील समाजसेवक डॉ. अशोक पवार यांनी केला. यात प्रथम- सागर जाधव, द्वितीय- सई गोरे, तृतीय- प्रणाली खरात आलेत. तसेच २० विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक पवार हे होते. तसेच केंद्रप्रमुख श्री वैष्णव, प्रशालाचे मुख्याध्यापक श्री भोईर, नितीन बारगळ, श्री शिरसे, श्री माळी, श्री गरड, श्री खरात, श्री यडपलवार,सह केंद्र अंतर्गत शिक्षक उपस्थित होते. श्री यडपलवार यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचे मार्गदर्शन केले, तर श्री माळी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व पालक व विद्यार्थी तसेच विभागातील शिक्षकांनी डॉ. पवार यांची भेट घेतली.

नवोदय विद्यालय चे प्राचार्य व शिक्षक तसेच माध्यमिक शिक्षण अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी या उपक्रमाचे कौतुक करुण आभार मानले.






## "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" अभियान श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गुरुकुल वेरूळ चा छ. संभाजीनगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक







**वेरूळ:-** येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) ने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र.२ महाराष्ट्र शासनाने आयोजित अभियानांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये झालेल्या पडताळणीत निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु श्री संत जनार्दन स्वामी तसेच त्यांचे उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, प्रेरणेने संस्थेचे सचिव श्री १०८ महंत स्वामी सेवागिरी जी महाराज यांच्या मार्गदर्शनाने, ब्र. अविर मुक्तेश्वरनंदजी महाराज, व गुरुकुल विकास समिती अध्यक्ष श्री. अंकुशजी जाधव गुरुजी यांच्या मार्गदर्शनाने छत्रपती संभाजीनगर जिल्हा स्तरावर खाजगी व्यवस्थापन संस्थांतर्गत शाळांमधून प्रथम क्रमांक मिळवला.

शालेय विभागामार्फत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रथम, द्वितीय, तृतीय अशा जिल्हा परिषद व खाजगी व्यवस्थापन अशा पात्र शाळांचा बक्षीस वितरणाचा सोहळा आज दिनांक १० जानेवारी २०२५ वार शुक्रवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ नाट्यगृहामध्ये दुपारी २ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिक्षण विभागाकडून "मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा" पारितोषिक बक्षीस वितरणासाठी प्रमुख अतिथी मान्यवर म्हणूनमहामहिम राज्यपाल मा. श्री हरिभाऊजी बागडे (राजस्थान), विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री अंबादासजी दानवे साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विकास मीना साहेब, एसएससी मंडळाचे अध्यक्ष श्री अनिलजी साबळे साहेब, जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर माननीय माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती लाटकर ताई, प्राथमिक शिक्षणाधिकारी माननीय श्रीमती जयश्री ताई चव्हाण, योजना शिक्षणाधिकारी श्रीमती भूमकर ताई, खुलताबाद पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी श्री केवट साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी श्री भोसले साहेब हे होते.

तसेच शिक्षण व राजकीय क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र व पारितोषिक देण्यात आले. यावेळी बक्षीस स्विकारण्यासाठी संस्था व गुरुकुल मधून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री काकासाहेब गोरे साहेब, गुरुकुल विकास समितीचे अध्यक्ष श्री अंकुशजी जाधव साहेब, वेरुळ गुरुकुल माध्य. व उच्च माध्यमिक चे प्राचार्य श्री बोरसे व्ही.यु., विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक श्री अधाने गुरुजी, प्राथमिक गुरुकुलच्या मुख्याध्यापिका श्रीमती ताले ताई, श्री राठोड गुरुजी, श्री भोजने गुरुजी, श्री पगार गुरुजी, श्री जाधव गुरुजी श्री बाळासाहेब चव्हाण गुरुजी व इतर अनेक प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते. वेरुळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) ने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा अध्यात्म शिरोमणी, श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी मिळवण्यासाठी प्रयत्न केलेल्या सर्व गुरुजनांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे सचिव महंत १०८ सेवागिरीजी महाराज, ब्र.अविर्मुक्तेश्वरनंदजी महाराज, तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जानेवारी २०२५


# सुधारणावादी मातृविद्यापीठ : राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ





१७ व्या शतकातील एक सुधारणावादी व परिवर्तनवादी विचार मांडत कृती करणाऱ्या, आपल्या राजकीय आयुष्यात कधीही अंधश्रद्धाना थारा न देणाऱ्या, प्रगतशील विचारांच्या, स्त्रीशक्ती आणि राष्ट्रशक्तीच्या प्रतीक असलेल्या राष्ट्रमाता, राजमाता माँसाहेब जिजाऊ यांची आज जयंती. त्या निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन...!

माँसाहेब जिजाऊ यांचा जन्म सिंदखेडराजा नगरीत लखुजीराव जाधव, गिरजाईराणी उर्फ म्हाळसाराणी यांच्या पोटी दि. १२ जानेवारी, १५९८ रोजी झाला. जिजाऊंचे व्यक्तिमत्व म्हणजे धैर्य, शौर्य, प्रचंड आत्मविश्वास, इच्छाशक्ती आणि गरीबांप्रती प्रचंड तळमळीने ओतप्रोत भरलेले. राजे लखुजी यांनी दत्ताजी, अचलोजी, बहादुरजी, राघुजी या चार पुत्रा बरोबर पाचव्या एकुलत्या एक जिजाऊ या लाडक्या लेकीच्या शिक्षणासाठी शिक्षकाची नेमणूक केली. ते त्यांना संस्कृत आणि गणित शिकवायचे ! जिजाऊंना मराठी, फार्सी, संस्कृत, कन्नड, तेलगू, उर्दू, हिंदी आदी भाषा अवगत होत्या. जिजाऊ बहुभाषिक होत्या. लहानपणापासून चुणचुणीत व चाणाक्ष बुध्दीच्या होत्या. स्वत: युद्धकलेत निपूण होत्या. त्या घोडेस्वारीमध्ये तरबेज होत्या. त्यांच्या पराक्रमाचे आणि लढाऊवृत्तीचे वर्णन त्यांना प्रत्यक्ष पाहणाऱ्या समकालीन कविंद्र परमानंदाने 'शिवभारत' या ग्रंथात केलेले आहे.

सन १६०५ मध्ये जिजाऊंचा विवाह शूर व पराक्रमी शहाजीराजे भोसले यांच्यासोबत झाला. या आदर्श दांपत्याच्या पोटी, १९ फेब्रुवारी, १६३० रोजी शिवनेरी किल्यावर महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यांनी स्वराज्याची इंचभर भूमीदेखील शत्रूला जिंकू दिली नाही. या मागे पाठबळ होते माँसाहेबांचे. जिजाऊंनी आपल्या राज्यात आणि आयुष्यात कोणताही भेदभाव केला नाही कि मानला नाही. तानाजी मालुसरे, शिवा काशिद, मदारी मेहतर, संभाजी जाधव, येसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, नुरखान बेग, दर्यासारंग, जोताजी केसरकर, रायप्पा आदी अठरापगड जाती-धर्माचे तरुण सोबत घेत स्वराज्याची स्थापना केली, सर्व जातीतील माणसांना रयत मानत आपलं मानलं, स्वराज्यात केवळ कर्तुत्व आणि क्षमता पाहूनचं तरुणांना महत्त्वाच्या, मोक्याच्या आणि मार्याच्या जागेवर व पदावर निवडले जात आसे.

जिजाऊंनी स्वराज्याच्या पवित्र कार्यात सक्रिय सहभाग घेतला. मावळ्यांना लेकरांसारखे जपून त्यांच्यात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि लढण्याचे बळ निर्माण केले. त्यांच्या उदात्त विचारांनी शिवरायांना साथ देणारे सर्व जातीमधील मावळे निर्भीडपणे पुढे आले. जिजाऊंनी मावळ्यांवर उदात्त विचारांचे मानवतावादी संस्कार केले. शिवरायांना यश मिळावे यासाठी यज्ञ, तप, शांती, उपवास करीत बसल्या नाहीत. यश मिळवण्यासाठी हाती तलवार घ्यावी लागते, चातुर्य पणाला लावावे लागते, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. यावर जिजाऊंचा द्रुढ विश्वास होता. माँसाहेब जिजाऊ प्रयत्नवादी होत्या. शिवरायांवर चालून आलेल्या शत्रुचा नायनाट करण्यासाठी जिजाऊंनी मार्गदर्शन केले. "आईच्या कर्तृत्वात मुलाचे भाग्य लपलेले असते," या नेपोलियनच्या विचारांचा प्रत्यय छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून येतो. स्वराज्य स्थापनेतील त्यांच्या यशामागे राजमाता जिजाऊंचे मार्गदर्शन आणि प्रेरणा होती. जिजाऊंचा इतिहास हा नवयुगाच्या निर्मितीचा उज्ज्वल आदर्श आहे.

सेतू माधवराव पगडी म्हणतात, “आपल्या विख्यात पुत्राने आयुष्यभर चालविलेल्या संघर्षात जिजाबाई ही लाख मोलाची स्फूर्ती देणारी स्त्री होती. म्हणजे राजमाता जिजाऊंच्या अंगी काळाबरोबर धावण्याचे भान होते. शिवाय काळाच्या मर्यादा ओलांडून भविष्याचा वेध घेणारी प्रागतिक-परिवर्तनवादी दृष्टी होती हे अनेक घटनांवरून सिद्ध होते.” बंगलोरहून सन १६४१ मध्ये जिजाऊ बालशिवरायांसह पुण्यात आल्या. आदिलशहाने पुण्यावरून गाढवाचा नांगर फिरवला आणि लोखंडी पहार रोवून त्यास केरसुणी, तुटलेली चप्पल आणि फुटकी कवडी अडकवून पुणे बेचिराख केले होते. आदिलशहाने अशुभतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या चिन्हांनी पुण्यभूमी बेचिराख केली होती. धर्मानुसार ही प्रतिके अशुभतेची मानल्या जात होती. यामुळे अशा ठिकाणी पुन्हा कोणी वस्ती करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा वंश निर्वंश होईल, धार्मिक समजुत पुरोहित वर्गाने घालून जनतेच्या मनात भीती निर्माण केली होती, धार्मिक भीतीला न जुमानता, जिजाऊंनी लोखंडी पहार काढून टाकली आणि शिवरायांच्या हातात सोन्याचा नांगर देऊन पुण्यभूमी पुनर्जीवित केली. आत्मविश्वास जागवत, त्यांनी पुण्याची पुनर्स्थापना केली, जिजाऊने हा शकून-अपशकूनावर केलेला मोठा प्रहार होता. एवढेच नाही तर तिथे लाल महाल बांधला तेव्हा कोणतेही मुहूर्त न पहाता बांधकाम केले. मुहूर्ताच्या कल्पनांना फेटाळून नव्या परिवर्तनाचा मार्ग दाखवला.

सन १६६४ मध्ये शहाजीराजेंच्या मृत्यूनंतर जिजाऊ सती गेल्या नाहीत, तर कर्तव्याला प्राधान्य देत स्वराज्य निर्मितीच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. डॉ. एस. ए. बाहेकर लिहितात, “जिजाऊंनी सती प्रथेविरुद्ध बंड करून बुद्धिनिष्ठतेचा आदर्श घालून दिला.” ते पुढे लिहितात, “जिजाऊ बुद्धीनिष्ठ होत्या. अन्यथा त्यांनी सती प्रथेविरूद्ध बंड केलेच नसते”. त्यांनी शिवरायांना न्यायनिवाड्याचे धडे दिले आणि गावागावातील तंटे मिटवत, कोणावरही अन्याय होणार नाही, याची काळजी घेत.

जिजाऊंनी आणि शिवबांनी आपल्या राज्यात कधीच हिंदू-मुस्लिम असा भेद केला नाही. सिद्दी इब्राहिम, सिद्दी जोहर, मसूद खान, अंबर वहाब, शमा खान, नूर खान बेग हे सर्व आरमार प्रमुख, तर इब्राहिम पठाण, दाऊद खान, मसूद खान, हुसेन खान, जाफर खान, मदारी मेहतर, काजी हैदर, मोहंमद खान हकीम आदी मुस्लिम सरदार शिवरायांचे विश्वासू सहकारी होते. जिजाऊंनी 'मता' नावाच्या एका मुसलमान कलावंतिणीच्या म्हातारपणाची अडचण ऐकून तिला दरबाराकडून वेतन देण्याची सोय केली होती. १० नोव्हेंबर, १६५९ रोजी अफजलखानाचा वध झाला. संभाजी कावजींनी खानाचे शीर धडावेगळे करून जिजाऊंना पाठवले. जिजाऊंनी ते शीर सन्मानपूर्वक प्रतापगडाच्या बुरुजाखाली दफन करण्याचा आदेश दिला. तेथे कबर बांधून दिवाबत्तीची कायमस्वरूपी व्यवस्था केली गेली. हे ठिकाण आज “अब्दुल्ला टॉवर” किंवा "अफजलखान बुरुज" म्हणून ओळखले जाते. जिजाऊंचा आणि शिवरायांचा लढाई ही मोगल साम्राज्य आणि अन्याय विरोधात होती, ध्येय रयतेचे स्वराज्य निर्माण करणे हे होते. लढाई कोणत्या एका धर्मा विरुध्द किंवा धार्मिक नव्हे तर राजकीय होती, हे लक्षात घेणे आवश्यक वाटते. कारण जिजाऊंच्या एकूण जीवन चरित्र आणि कार्यकर्तृत्वतून ते धर्मनिरपेक्ष तत्वाला धरून होते, हे लक्षात येते.

जिजाऊंच्या सूचनेनुसार शिवरायांनी सईबाईंचे भाऊ बजाजी निंबाळकर यांचे शुद्धीकरण केले, जे मुस्लिम झाले होते. जिजाऊ स्वतः शिखरशिंगणापूरला जाऊन हे शुद्धीकरणाचे कार्य पूर्ण केले. ४०० वर्षांपूर्वीच्या या मातृहृदयी जिजाऊंच्या मानवतावादी आणि सुधारणावादी विचारांचा आदर्श घेत, त्यांच्या कर्तृत्वाचा वसा पुढे नेत, आपण आधुनिक भारताच्या निर्मितीचा संकल्प करूया. त्यांच्या जयंती निमित्त या उदात्त विचारांना आपण कृतियुक्त वंदन करुया..! -




**डॉ. प्रकाश खेत्री,**
छ. संभाजीनगर
७८४३०९२२४४prakashkhetri0
44@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ जानेवारी २०२५




मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट जवळ, औरंगाबाद